# –: नि.दि.दावा क्र.४७/२०२४ मधील नि.क्र.०५ वरील आदेश :–

*(पारित दि.२०/१२/२०२५)*

**०१.** प्रस्तुत अर्ज वादी क्र.१ ते ३ यांनी प्रतिवादी क्र.१ यांच्याविरूद्ध तुर्तातुर्त ताकीद मिळण्यासाठी दाखल केला असून वादी क्र.१ ते ३ यांचे कथन आहे की, दावा कलम १अ व १ब मध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकती (संक्षेपासाठी यापुढे ज्यास 'दावा मिळकत १अ व १ब' असे संबोधले आहे.) ह्या वादी व प्रतिवादी क्र.२ ते २१ यांचे मालकीचे आहेत असे जाहीर होवून मिळण्यासाठी वादीने दावा दाखल केला आहे, 'दावा मिळकत १अ ही वादी व प्रतिवादी क्र.२ ते २१ यांची वडीलार्जित वारसा व खरेदी मालकी हक्क कब्जे वहिवाटीची मिळकत असून सदर मिळकतीतून पश्चिमेकडून पुर्वेकडे जाणारा भिकवडी खुर्द ते नेवरी हा पुर्वपश्चिम चालीचा डांबरी रस्ता दोन ठिकाणी वळण घेवून गेलेला आहे व सदर रस्त्याचे क्षेत्र संपादन न केलेमुळे दावा कलम १अ या मिळकतीचे महसूल रेकॉर्डला स्वतंत्र भाग झालेले नाहीत, परंतु, सदर रस्त्यामुळे दावा कलम १अ या मिळकतीचे दक्षिण व उत्तर असे दोन भाग झालेले आहेत, सदर रस्त्याचे उत्तर बाजूस दावा मिळकत १अ पैकी दावा १ब मिळकत असून ती दक्षिण बाजूपेक्षा क्षेत्राने लहान असलेने वादी व प्रतिवादी क्र.२ ते २१ हे सदरील जागेचा वापर उकीरडा म्हणून शेणखत टाकणे, जळणकाटूक टाकणे इ.साठी करीत होते, दावा मिळकत १अ चे उत्तर, पुर्व व दक्षिण या तिन्ही दिशेला लगत गावठाण असून प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकतीचे उत्तर अंगास गावठाणातील खुली जागा ही त्यांचे स्वत:चे मालकीची आहे असे भासवून सन १९९३–९४ साली ग्रामपंचायत मिळकत क्र.३६८/अ ची त्यांचे नावे नोंद करुन घेतली असुन सदरची नोंद करुन घेत असताना सदर जागेचे क्षेत्र हे ०५ गुंठे असे नमूद केले असून त्यामध्ये उकिरडे व देवस्थान असे नमूद करुन चतु:सिमेस पश्चिमेस, दक्षिणेस व उत्तरेस रस्ता असे नमूद करुन ग्रामपंचायत उताऱ्यास नोंद केली आहे, सन १९९६–९७ ते ९९–२००० चा ग्रामपंचायत मिळकत क्र.३७६ पाहता सन १९९४ सालचीच ग्रा.मि.क्र.३६८/अ चाच उल्लेख केलेला दिसून येतो, परंतु, त्यामध्ये देवस्थान क्षेत्र ३४ X ५१ असे नमूद केले आहे, सदर जागेचा अद्याप सिटी सर्व्हे झालेला नाही, सन २०१९–२० ते २०२२–२३ चा ग्रामपंचायत मिळकत क्र.३७० चा नमुना क्र.८ उतारा पाहिला तर तो सन १९९४ सालच्या ग्रा.मि.क्र.३६८/अ चाच दिसून येत असून त्यामध्ये कच्चे घर, झोपडी किंवा मातीचे घर, असे नमूद करुन देवस्थान व उकिरडे यांना वगळून ५१ X ३५ = १७८५ त्यापुढे ५ गुंठे असे नमूद केलेचे दिसून येत आहे, कच्चे घर झोपडी मातीचे घर यापैकी काहीही ग्रामपंचायतीत बांधायची व वापरायची आवश्यकता नसताना कोणत्या ठरावाने अशा बोगस नोंदी ग्रामपंचायतीने केल्या, हे समजून येत नाही, त्यामुळे सकृतदर्शनी प्रतिवादी क्र.१ ने बळाचा व सत्तेचा गैरवापर करुन वादींच्या मिळकती कायमस्वरुपी हडप करणेच्या दृष्टीने हेतु दिसून येत आहे, ग्रामपंचायत मिळकत क्र.३६८/अ, ३७०, ३७६ चे उतारे पाहिले असता प्रतिवादी क्र.१ यांचे ताब्यात सत्ता असलेचा गैरफायदा घेवून त्यांनी अनुकूल नोंदी करुन घेतलेल्या आहेत, अशा परिस्थितीत दि.१५/०३/२०२३ रोजीच्या

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2025.12.20 17:35:15 +0530

मासिक सभेत ग्रा.मि.क्र.३७० नमूद करुन सदर ठिकाणी नवीन ग्रामसचिवालयाची इमारत बांधून लोकांची गैरसोय दूर करणेच्या हेतूने ए.टी.पिकअप शेडची उभारणी करण्याचा ठराव करणेत आला, त्या ठरावाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांनी ऑक्टोंबर २०२३ मध्ये ग्रा.मि.क्र.३७० च्या चतु:सिमेस पुर्व, दक्षिण व पश्चिमेस रस्ता असलेचा नोंद असलेचा गैरफायदा घेवून वादींचे दावा मिळकत १ब मध्ये नमूद भिकवडी खुर्द ते नेवरी या रस्त्याच्या उत्तरेकडील क्षेत्रात म्हणजेच गट क्र.६७९ ते ६८२ च्या उत्तरेकडील क्षेत्रात बांधकाम करणेस सुरुवात केली, त्यावेळी वादी क्र.१,३ व प्रतिवादी क्र.१९,२० यांनी वकीलांचेमार्फत दि.१७/१०/२०२३ रोजी रजि.नोटीस प्रतिवादी क्र.१ यांना पाठवून दावा मिळकतीमध्ये बांधकाम करु नये असे कळविलेनंतर प्रतिवादी क्र.१ ने सदरचे बांधकाम तहकूब केले होते, परंतु, त्यास आता बराच काळ लोटला आहे याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र.१ ने पुन्हा बांधकाम सुरु केले असून सदर बांधकामाचे खड्डे काढून पिलर उभा करण्याचे काम चालू आहे, वादींना कुणकुण लागताच ते बांधकाम वादींनी हाणून पाडले, वादींनी विरोध केला असता प्रतिवादी क्र.१ हे त्यांचेकडे असले पैशाचे मनुष्यबळाचे जोरावर, वादी हे अल्पसंख्यांक समाजापैकी असलेचा गैरफायदा घेवून वादींचे विरोधास न जुमानता दावा मिळकत १ब मध्ये अनाधिकाराने व बेकायदेशीरपणे बांधकामासाठी दक्षिणाभिमुखी एस.टी.पिकअप शेडचे तीन पिलर व ग्रामसचिवालयाचे ५ पिलरचे कॉलम दावा मिळकत १ब मध्ये उभे करणेच्या तयारीत आहेत, दावा मिळकत १ब मध्ये प्रतिवादी क्र.१ ने बांधकाम केलेस वादींना नाहक मिळकतीस मुकावे लागणार आहे व वादींचे कधीही पैशात न भरुन येणारे नुकसान होणार आहे, त्यामुळे, सदर दाव्याचा अंतिम निर्णय होईपावेतो प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकत १ब मध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये अगर वादींचे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा होईल असे कोणतेही कृत्य करु नये, अशी तुर्तातुर्त ताकीद देणेसाठी वादी क्र.१ ते ३ यांनी विनंती केली आहे.

**०२.** प्रतिवादी क्र.१ तर्फे नि.क्र.३५ येथे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले असून प्रतिवादी क्र.१ ने वादींच्या अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा, काल्पनिक, लबाडीचा, बनावट असल्याचे कथन करुन सदरचा मजकूर नाकारलेला आहे. प्रतिवादी क्र.१ ने कथन केले आहे की, दावा कलम १अ मध्ये दिलेले दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे, अपुरे असून वादीने चुकीच्या चतु:सिमा दिलेल्या आहेत व मोजमापे दिलेली नाहीत, वादींनी प्रतिवादी क्र.१ ला सी.पी.सी. कलम ८० नुसार द्यावी लागणारी २ महिने मुदतीची दावा पूर्व नोटीस दिलेली नाही, तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम १८० प्रमाणे द्यावी लागणारी ३ महिने मुदतीची दावा पूर्व नोटीस दिलेली नाही, गट क्र.६७९,६८०,६८१ व ६८२ चे ७/१२ उताऱ्यांवरील सर्व लोकांना वादींनी दाव्याचे कामी पक्षकार केलेले नाही, वादींनी प्रतिवादी क्र.१ ला दि.१७/१०/२०२३ रोजी वकीलांमार्फत पाठविलेल्या नोटीसमधील मजकूर खोटा व लबाडीचा असून सदर मजकूर प्रतिवादी क्र.१ हे स्पष्टपणे नाकारीत आहेत व त्यावर वादींच्या सह्या नाहीत, वादी क्र.३ चे मालकीचा गट क्र.६८२ असून गट क्र.६८२ ची मोजणी उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय कडेगांव यांचेमार्फत मोजणी रजिस्टर क्र.२७१ ने

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2025.12.20 17:35:26 +0530

दि.०५/०१/२०२४ रोजी केलेली असून मोजणीच्या हद्दी दि.२५/०१/२०२४ रोजी दाखविलेल्या असून सदर गट क्र.६८२ ची उत्तरेकडील हद्द ही माहुली, चिखलहोळ, येतगांव, भिकवडी, खेराडेविटा, अमरापूर या प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२४ च्या उत्तर हद्दीपर्यंत आलेली आहे, म्हणजे सदरचा प्रमुख जिल्हा मार्ग २४ हा गट क्र.६८२,६७९,६८०,६८१ व ६८२ चे उत्तर हद्दीचे आतून जात आहे हे स्पष्ट झालेले असून सदरचा डांबरी रस्ता हा जागेवरती १५ फुट रुंदीचा आहे, मौजे भिकवडी गावची ग्रामपंचायत स्थापना सन १९५८ साली झालेली असून ग्रामपंचायतच्या मालकीच्या गावामध्ये काही खुल्या जागा मिळकती होत्या त्याची नोंद नव्हती म्हणून ग्रामपंचायतीने मिळकत क्र.३६६ व नंतर नंबर ३६८अ व सध्याचा नंबर ३७० च्या नोंदी १९९२ सालचे दरम्यान पहिल्यांदा व पुढे वेळोवेळी केलेल्या आहेत, सदर ग्रामपंचायत मिळकतीमध्ये पिकअप शेड तसेच ग्रामसचिवालयाची इमारत बांधणेचा निर्णय ग्रामपंचायतीने केलेला असून तसा ठराव दि.२५/०१/२०२३ रोजी ठराव क्र.२४ ने मासिक मिटींग मध्ये केलेला आहे, ग्रामपंचायतीचे मालकीचे मिळकतींमध्ये प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२४ चे उत्तर बाजूस पुर्वेकडील बाजूस ११ फूट रुंद दक्षिणउत्तर व २१ फूट लांब पुर्वपश्चिम असे पिकअप शेडचे बांधकाम सुरु केले असून त्याचे फाऊंडेशन करुन झालेले आहे, सदरचे पिकअप शेड हे म्हसोबा देवस्थानचे पश्चिम बाजूस आहे, सदरचे पिकअप शेडचे अंदाजे किंमत ही एकूण र.रु.५,००,०००/- मात्र असून त्यापैकी र.रु.२,५०,०००/- मात्रचे काम झालेले आहे, तसेच ग्रामपंचायत मिळकत क्र.३७० मध्ये पिकअप शेडचे पश्चिम बाजूस ग्रामसचिवालयाचे र.रु.१४,९९,७४४/- चे एकूण काम असून त्यापैकी र.रु.५,००,०००/- खर्च झालेले असून फाऊंडेशन पुर्ण झालेले आहे, सदर पिकअप शेड व ग्रामसचिवालयाचे काम हे स्थानिक आमदार श्री.विश्वजीत पतंगराव कदम यांचे आमदार फंडातून सुरु आहे, तसेच सदरची दोन्ही कामे सर्व शासकीय परवानगी घेवूनच रितसरपणे ग्रामपंचायतीचे मालकीचे जागेमध्ये सुरु आहेत.

**०३.** प्रतिवादी क्र.१ ने पुढे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१ ने वादींच्या गट क्र.६७९,६८०,६८१ व ६८२ या शेतजमीन मिळकतींमध्ये कधीही अतिक्रमण करुन बांधकाम केलेले नव्हते व नाही, गट क्र.६७९ चे पुर्व बाजूने उत्तरेकडून दक्षिणेकडे शेतात जाणारा असा रस्ता आहे, तसेच गट क्र.६७९,६८०,६८१ व ६८२ चे दक्षिण बाजूस वादी व प्रतिवादी क्र.२ ते २१ तसेच इतर लोकांची घरे आहेत, तसेच सदर माहुली ते अमरापूर जाणाऱ्या रस्त्याच्या उत्तर बाजूस गावठाणची हद्द सुरु होत आहे, वादींनी सदरचा दावा मुदतीमध्ये दाखल केलेला नसलेमुळे सदरचे दाव्यास मुदतीचे कायद्याची बाधा येत आहे, दाव्याचे कामी प्रथमदर्शनी केस प्रतिवादी क्र.१ ने शाबीत केली असून दाव्याचे कामी न्यायाचा तराजू प्रतिवादी क्र.१ चे बाजूने झुकत आहे, तुर्तातुर्त ताकीद अर्ज नामंजूर केलेस वादीचे काहीही नुकसान होणार नाही, याउलट तुर्तातुर्त ताकीद अर्ज मंजूर केलेस प्रतिवादी क्र.१ ला त्याचे मालकी हक्क वहिवाटीचे जमीनीस मुकावे लागणार आहे, त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ ने प्रस्तुत तुर्तातुर्त ताकीदीसाठीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2025.12.20 17:35:44 +0530

**०४.** प्रस्तुत अर्जातील आपल्या कथनांच्या पुष्ट्यर्थ वादी क्र.१ ते ३ यांचेतर्फे खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा दिलेला आहे–

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ३/१ | मौजे भिकवडी खुर्द येथील गट क्र.६७९ चा सन २०२३–२०२४ चा ७/१२ उतारा |
| २. | ३/२ | मौजे भिकवडी खुर्द येथील गट क्र.६८० चा सन २०२३–२०२४ चा ७/१२ उतारा |
| ३. | ३/३ | मौजे भिकवडी खुर्द येथील गट क्र.६८१ चा सन २०२३–२०२४ चा ७/१२ उतारा |
| ४. | ३/४ | मौजे भिकवडी खुर्द येथील गट क्र.६८२ चा सन २०२३–२०२४ चा ७/१२ उतारा |
| ५. | ३/५ | मौजे भिकवडी खुर्द येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.३६८ चा सन १९९३–१९९४ चा नमुना ८ चा उतारा |
| ६. | ३/६ | मौजे भिकवडी खुर्द येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.३७६ चा सन १९९६–१९९७ ते १९९९–२००० चा नमुना ८ चा उतारा |
| ७. | ३/७ | मौजे भिकवडी खुर्द येथील फेरफार क्र.४०५४ चा उतारा |
| ८. | ३/८ | मौजे भिकवडी खुर्द येथील फेरफार क्र.४६६२ चा उतारा |
| ९. | ३/९ | मौजे भिकवडी खुर्द येथील फेरफार क्र.४०७१ चा उतारा |
| १०. | ३/१० | मौजे भिकवडी खुर्द येथील फेरफार क्र.४२१२ चा उतारा |
| ११. | ३/११ | मौजे भिकवडी खुर्द येथील फेरफार क्र.४८८० चा उतारा |
| १२. | ३/१२ | दि.१६/०८/१९६९ रोजीचे खरेदीपत्र दस्त क्र.२८४९/१९६९ व दि.१२/०५/१९८० रोजीचे खुषखरेदीपत्र दस्त क्र. ९८०/१९८० |
| १३. | ३/१३ | मौजे भिकवडी गावचा गावनकाशा |
| १४. | ३/१४ | दि.२३/०२/२०२४ रोजीचे वादी क्र.१ श्री.संजय दादासो गायकवाड यांना दिलेले माहिती अधिकाराचे पत्र व सोबतची कागदपत्रे |
| १५. | ३/१५ | दि.२३/०२/२०२४ रोजीचे वादी क्र.३ श्री.जगन्नाथ धर्मा गायकवाड यांना दिलेले माहिती अधिकाराचे पत्र व सोबतची कागदपत्रे |
| १६. | ३/१६ | वाद मिळकतीचा कच्चा हातनकाशा |
| १७. | ३/१७ | वाद मिळकतीचे फोटो |

MADHAVI RAMESH PATKAR
Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR
Date: 2025.12.20 17:35:57 +0530

| | | |
|---|---|---|
| १८. | ३/१८ | फोटोचे बिल व सी.डी. |
| १९. | ३/१९ | वादींनी प्रतिवादी क्र.१ यांना पाठविलेले नोटीस |
| २०. | ३/२० | वादींनी पाठविलेल्या नोटीसची पावती |

**०५.** प्रतिवादी क्र.१ ने आपल्या कथनांच्या पुष्ट्यर्थ खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा दिलेला आहे.

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ४२/१ | दि.२७/०३/२०२४ रोजीचा ग्रामपंचायत कार्यालय, भिकवडी खुर्द यांचेकडील मासिक सभा ठराव |
| २. | ४२/२ | दि.०६/०९/२०२३ रोजीचा जिल्हा परिषद सांगली बांधकाम विभाग यांचेकडील पिकअप रोडबाबत कार्यारंभ आदेश |
| ३. | ४२/३ | दि.०६/०९/२०२३ रोजीचा जिल्हा परिषद सांगली बांधकाम विभाग यांचेकडील मिळकत क्र.३७० ग्रामपंचायत इमारत बांधकाम करणेबाबत कार्यारंभ आदेश |
| ४. | ४२/४ | भिकवडी खुर्द येथील ग्रामपंचायत मालमत्ता क्र.३६८अ चा नमुना ८ चा उतारा |
| ५. | ४२/५ | भिकवडी खुर्द येथील ग्रामपंचायत मालमत्ता क्र.३६६ चा नमुना ८ चा उतारा |
| ६. | ४२/६ | दि.२७/०३/२०२४ रोजीचे भुमीअभिलेख कार्यालय कडेगांव यांचेकडील पत्र |
| ७. | ४२/७ | दि.२५/०१/२०२३ रोजीचा ग्रामपंचायत कार्यालय, भिकवडी खुर्द यांचेकडील मासिक सभा ठराव क्र.२४ |
| ८. | ४२/८ | जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेकडील आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत मौजे भिकवडी खुर्द येथील ग्रामपंचायत इमारत बांधकामाचे अंदाजपत्रकाची प्रत |
| ९. | ४२/९ | जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेकडील आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत मौजे भिकवडी खुर्द येथील एस.टी.पिकअप शेड बांधणेबाबतचे अंदाजपत्रकाची प्रत |
| १०. | ४२/१० | बांधकामाचे फोटो |
| ११. | ४२/११ | गट क्र.६८२ चा मोजणी रजि.क्र.२७१ चा मोजणी नकाशा |
| १२. | ४२/१२ | सर्व्हे क्र.१६२ चा नकाशा |
| १३. | ४२/१३ | मौजे भिकवडी खुर्द येथील गट नकाशा |

MADHAVI RAMESH PATKAR
Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR
Date: 2025.12.20 17:36:06 +0530

| | | |
|---|---|---|
| १४. | ४२/१४ | ग्रामपंचायत कार्यालय, भिकवडी खुर्द यांचेकडील गटविकास अधिकारी, पंचायत समिती कडेगांव यांना बांधकाम सुरु करणेबाबत दिलेले पत्र |
| १५. | ४२/१५ | भिकवडी खुर्द येथील ग्रामपंचायत मालमत्ता क्र.३७० चा नमुना ८ चा उतारा |
| १६. | ४२/१६ | वाद मिळकतीबाबतचा कच्चा हात नकाशा |

**०६.** प्रतिवादी क्र.१ यांच्यातर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. पुरेशी संधी देउनही प्रस्तुत अर्जावर वादींच्या वतीने युक्तिवाद करण्यासाठी वादींतर्फे कोणीही हजर राहिले नसल्याने विनायुक्तिवाद प्रस्तुत अर्ज आदेशासाठी नेमणेबाबत दि.०९/१०/२०२५ रोजी वादींविरुध्द आदेश झालेला आहे. प्रस्तुत खटल्यात दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केल्यानंतर खालील वादबिंदू माझ्या विचारार्थ येत असून त्यावरील माझे निष्कर्ष कारणासहीत खाली नोंदविले आहेत–

| अ.क्र | वादबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी क्र.१ ते ३ यांनी सकृतदर्शनी दावा त्यांच्या बाजुने असल्याचे शाबीत केले आहे का? | नाही. |
| २. | न्यायाचा समतोल वादी क्र.१ ते ३ यांच्या बाजुने आहे, असे वादी क्र.१ ते ३ यांनी शाबीत केले आहे का ? | नाही. |
| ३. | तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर झाल्यास वादी क्र.१ ते ३ यांचे कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होईल असे वादी क्र.१ ते ३ यांनी शाबीत केले आहे का ? | नाही. |
| ४. | काय आदेश ? | नि.क्र.५ चा अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

**०७.** प्रस्तुत खटल्यातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे दिसून येते की, 'दावा मिळकत १अ ही वादी व प्रतिवादी क्र.२ ते २१ यांची वडीलार्जित वारसा व खरेदी मालकी हक्क कब्जे वहिवाटीची मिळकत असून सदर मिळकतीतून पश्चिमेकडून पुर्वेकडे जाणारा भिकवडी खुर्द ते नेवरी हा पुर्वपश्चिम चालीचा डांबरी रस्ता दोन ठिकाणी वळण घेवून गेलेला आहे व सदर रस्त्याचे क्षेत्र संपादन न केलेमुळे दावा कलम १अ या मिळकतीचे महसूल रेकॉर्डला स्वतंत्र भाग झालेले नाहीत, परंतु, सदर रस्त्यामुळे दावा कलम १अ या मिळकतीचे दक्षिण व उत्तर असे दोन भाग झालेले आहेत, सदर रस्त्याचे उत्तर बाजूस दावा मिळकत १अ पैकी दावा मिळकत १ब असून ती दक्षिण बाजूपेक्षा क्षेत्राने लहान असलेने वादी व प्रतिवादी क्र.२ ते २१ हे सदरील जागेचा वापर उकीरडा म्हणून शेणखत टाकणे,

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2025.12.20 17:36:16 +0530

जळणकाटूक टाकणे इ.साठी करीत होते, दावा मिळकत १अ चे उत्तर, पुर्व व दक्षिण या तिन्ही दिशेला लगत गावठाण असून प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकतीचे उत्तर अंगास गावठाणातील खुली जागा ही त्यांचे स्वत:चे मालकीची आहे असे भासवून सन १९९३–९४ साली ग्रामपंचायत मिळकत क्र.३६८/अ ची त्यांचे नावे नोंद करुन घेतली असुन सदरची नोंद करुन घेत असताना सदर जागेचे क्षेत्र हे ०५ गुंठे असे नमूद केले असून त्यामध्ये उकिरडे व देवस्थान असे नमूद करुन चतु:सिमेस पश्चिमेस, दक्षिणेस व उत्तरेस रस्ता असे नमूद करुन ग्रामपंचायत उताऱ्यास नोंद केली आहे, दि.१५/०३/२०२३ रोजीच्या मासिक सभेत ग्रा.मि.क्र.३७० नमूद करुन सदर ठिकाणी नवीन ग्रामसचिवालयाची इमारत बांधून लोकांची गैरसोय दूर करणेच्या हेतूने ए.टी.पिकअप शेडची उभारणी करण्याचा ठराव करणेत आला, त्या ठरावाप्रमाणे वादींचे दावा मिळकत १ब मध्ये नमूद भिकवडी खुर्द ते नेवरी या रस्त्याच्या उत्तरेकडील क्षेत्रात म्हणजेच गट क्र.६७९ ते ६८२ च्या उत्तरेकडील क्षेत्रात बांधकाम करणेस सुरुवात केली व दावा मिळकत १ब मध्ये अनाधिकाराने व बेकायदेशीरपणे बांधकामासाठी दक्षिणाभिमुखी एस.टी.पिकअप शेडचे तीन पिलर व ग्रामसचिवालयाचे ५ पिलरचे कॉलम दावा मिळकत १ब मध्ये उभे करणेच्या तयारीत आहेत, त्यामुळे, सदर दाव्याचा अंतिम निर्णय होईपावेतो प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकत १ब मध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये अगर वादींचे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा होईल असे कोणतेही कृत्य करु नये, अशी तुर्तातुर्त ताकीद देणेसाठी वादींनी विनंती केली आहे. याउलट, प्रतिवादी क्र.१ यांनी कथन केले आहे की, वादी क्र.३ चे मालकीचा गट क्र.६८२ असून गट क्र.६८२ ची मोजणी उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय कडेगांव यांचेमार्फत मोजणी रजिस्टर क्र.२७१ ने दि.०५/०१/२०२४ रोजी केलेली असून मोजणीच्या हद्दी दि.२५/०१/२०२४ रोजी दाखविलेल्या असून सदर गट क्र.६८२ ची उत्तरेकडील हद्द ही माहुली, चिखलहोळ, येतगांव, भिकवडी, खेराडेविटा, अमरापूर या प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२४ च्या उत्तर हद्दीपर्यंत आलेली आहे, म्हणजे सदरचा प्रमुख जिल्हा मार्ग २४ हा गट क्र.६८२,६७९,६८०,६८१ व ६८२ चे उत्तर हद्दीचे आतून जात आहे हे स्पष्ट झालेले असून सदरचा डांबरी रस्ता हा जागेवरती १५ फुट रुंदीचा आहे, मौजे भिकवडी गावची ग्रामपंचायत स्थापना सन १९५८ साली झालेली असून ग्रामपंचायतच्या मालकीच्या गावामध्ये काही खुल्या जागा मिळकती होत्या त्याची नोंद नव्हती म्हणून ग्रामपंचायतीने मिळकत क्र.३६६ व नंतर नंबर ३६८अ व सध्याचा नंबर ३७० च्या नोंदी १९९२ सालचे दरम्यान पहिल्यांदा व पुढे वेळोवेळी केलेल्या आहेत, सदर ग्रामपंचायत मिळकतीमध्ये पिकअप शेड तसेच ग्रामसचिवालयाची इमारत बांधणेचा निर्णय ग्रामपंचायतीने केलेला असून तसा ठराव दि.२५/०१/२०२३ रोजी ठराव क्र.२४ ने मासिक मिटींग मध्ये केलेला आहे, ग्रामपंचायतीचे मालकीचे मिळकतींमध्ये प्रमुख जिल्हा मार्ग क्र.२४ चे उत्तर बाजूस पुर्वेकडील बाजूस ११ फूट रुंद दक्षिणउत्तर व २१ फूट लांब पुर्वपश्चिम असे पिकअप शेडचे बांधकाम सुरु केले असून त्याचे फाऊंडेशन करुन झालेले आहे, सदरचे पिकअप शेड हे म्हसोबा देवस्थानचे पश्चिम बाजूस आहे, सदरचे पिकअप शेडचे अंदाजे किंमत ही एकूण

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2025.12.20 17:36:24 +0530

र.रु.५,००,०००/– मात्र असून त्यापैकी र.रु.२,५०,०००/– मात्रचे काम झालेले आहे, तसेच ग्रामपंचायत मिळकत क्र.३७० मध्ये पिकअप शेडचे पश्चिम बाजूस ग्रामसचिवालयाचे र.रु.१४,९९,७४४/– चे एकूण काम असून त्यापैकी र.रु.५,००,०००/– खर्च झालेले असून फाऊंडेशन पुर्ण झालेले आहे, सदर पिकअप शेड व ग्रामसचिवालयाचे काम हे स्थानिक आमदार श्री.विश्वजीत पतंगराव कदम यांचे आमदार फंडातून सुरु आहे, तसेच सदरची दोन्ही कामे सर्व शासकीय परवानगी घेवूनच रितसरपणे ग्रामपंचायतीचे मालकीचे जागेमध्ये सुरु आहेत, प्रतिवादी क्र.१ ने वादींच्या गट क्र.६७९,६८०,६८१ व ६८२ या शेतजमीन मिळकतींमध्ये कधीही अतिक्रमण करुन बांधकाम केलेले नव्हते व नाही, त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ ने प्रस्तुत तुर्तातुर्त ताकीदीसाठीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०८.** याकामी वादी व प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकत १अ व १ब यांच्या मोजणीसाठी संयुक्त अर्ज नि.क्र.४६ लगत दिलेला होता व त्यावरील दि.०४/०५/२०२४ रोजीच्या आदेशानुसार दावा मिळकत १अ व १ब ची न्यायालयीन आयुक्त उपअधिक्षक भुमीअभिलेख कार्यालय कडेगांव यांचेमार्फत मोजणी होवुन नि.क्र.६३ लगत न्यायालयीन आयुक्त अहवाल दाखल झाला आहे. नि.क्र.६३ वरील न्यायालयीन आयुक्त अहवालातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ चे बांधकाम दावा मिळकत १अ व १ब मध्ये येत नाही. नि.क्र.६३ वरील न्यायालयीन आयुक्त अहवाल मान्य असल्याबाबत प्रतिवादी क्र.१ ने नि.क्र.६४ येथे म्हणणे दिले आहे. नि.क्र.६३ वरील न्यायालयीन आयुक्त अहवालावर वादींनी आजरोजीपर्यंत म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ चे बांधकाम दावा मिळकत १अ व १ब मध्ये येत नसल्याचे अभिलेखावरील कागदोपत्री पुराव्यावरून प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने प्रस्तुत दावा प्रथमदर्शनी वादींच्या बाजूने नाही, असे स्पष्ट होते. परिणामी, वादींनी प्रथमदर्शनी केस शाबीत केलेली नसल्यामुळे तौलानिक बाबींचा विचार करता न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे असे म्हणता येत नाही. त्यामुळे, सद्यस्थितीत तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर झाल्यास वादींचे कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होईल असे वादींनी सिद्ध केलेले नाही असे स्पष्ट होते. सबब, प्रतिवादी क्र.१ विरूद्ध तुर्तातुर्त ताकीद मिळण्यास वादी हे पात्र नाहीत, असा निष्कर्ष निघतो. परिणामी, वादबिंदू क्र.१ ते ३ चे उत्तर मी 'नकारार्थी' देते आणि वादबिंदु क्र.४ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते–

**०१.** वादींचा नि.क्र.५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

**०२.** अर्जाचा खर्च दाव्यासोबत.

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2025.12.20 17:36:34 +0530

**स्थळ : कडेगांव**
**दिनांक :२०/१२/२०२५**

**(श्रीम.माधवी र. पाटकर)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर,कडेगांव**